यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र
मुक्त विद्यापीठ, नाशिक
नॅक मानांकित 'अ' श्रेणी
विभागीय केंद्र, कोल्हापूर

Yashwantrao Chavan Maharashtra
Open University, Nashik
NAAC Accredited 'A' Grade
Regional Centre, Kolhapur
Shivaji University, Near Post Office, Vidyanagar
Kolhapur - 416004 (Maharashtra) India

संकेतस्थळ Website : www.ycmou.ac.in • https://ycmou.digitaluniversity.ac
ई-मेल E-mail : rd_kolhapur@ycmou.digitaluniversity.ac
दूरध्वनी Telephone : (0231) 2607022, 2607023

प्रति,
प्रा.डॉ.श्रीमती मृणालिनी निलेश देसाई
विवेकानंद महाविद्यालय,
कोल्हापूर

जा.क्र. कोआरसी/01/09/2025
दि.05.01.2026

**विषय: भरारी पथक महिला समिती सदस्या म्हणून नियुक्तीबाबत...**

**मा. महोदया**
**स.न.**

यशवंतराव चव्हाण महाराष्ट्र मुक्त विद्यापीठ, नाशिक. विभागीय केंद्र. कोल्हापूर अंतर्गत विविध शिक्षणक्रमांच्या हिवाळी सत्र अंतिम परीक्षा दि. 07.01.2026 ते दि. 27.01.2026 या कालावधीत आयोजित करण्यात आलेल्या आहेत. आपण महिला सदस्य म्हणून दि. 07.01.2026 ते दि. 27.01.2026 या कालावधीतील 16 दिवस वेळापत्रकानुसार भरारी पथक दौऱ्याचे आयोजन करावे. या 16 दिवसात प्रत्येक परीक्षाकेंद्रास किमान 04 वेळा भेटी द्याव्यात. या परीक्षा सुरळीत व निकोप वातावरणात पार पाडण्यासाठी आपण खालीलप्रमाणे कर्तव्याने व जबाबदारीने काम पार पाडून विद्यापीठास सहकार्य करावे, ही विनंती.

**भरारी पथकासाठी कर्तव्य / जबाबदाऱ्या / सूचना —**

01. भरारीपथकांनी परीक्षा केंद्रावर भेट देतांना त्या केंद्रावर जिथे प्रश्नपत्रिका download होतात त्या Control Room ला भेट देऊन तेथील जागेची गोपनीयता, प्रिंट करतांना व प्रिंट काढून झाल्यावर सीलबंद प्रश्नपत्रिका ठेवण्याची दक्षता याबाबतची पडताळणी कॉपी केसेस पाहण्यासोबतच करावी. याशिवाय महिला विद्यार्थीनींची तपासणी वर्गात न करता महिला कक्षात करावी. याची विशेष काळजी आपण घ्यावी.
02. प्रश्नपत्रिका मल्टीकॉपींग करण्याचे ठिकाण, मल्टीकॉपींग नंतर Block निहाय सिलबंद पाकिटे कपाटात सुरक्षित ठेवली जातात आणि कपाट पुन्हा सीलबंद करून परीक्षा सुरू होण्याच्या 15 मिनीटे आधी उघडून Block Supervisor ला सुपूर्त करणे, ही कामे CCTV च्या निगराणीत होतात का? एक, दोन दिवसाचे फुटेज तपासावे व खात्री करावी, वरील प्रक्रियेत त्रुटी असल्यास, फुटेज प्राप्त न झाल्यास त्वरीत विभागीय संचालकांना माहिती कळवावी. CCTV फुटेज जतन करण्यासंदर्भात परीक्षा केंद्रास अवगत करावे.
03. परीक्षा केंद्रावर नियुक्त केलेला कर्मचारी वर्ग हा विद्यापीठाने निश्चित केलेल्या कर्तव्य व जबाबदारीनुसार कामकाज करीत असल्याची खात्री करावी.
04. संवेदनशील परीक्षा केंद्रावर वारंवार भेटी द्याव्यात. अशा केंद्रावर बैठे भरारी पथक नियुक्त करावयाची आवश्यकता असल्यास त्याबाबत त्वरित विभागीय संचालकांना माहिती द्यावी. विद्यापीठाने निर्धारित केल्यानुसार परीक्षा केंद्रांवरील तांत्रिक (ICT) सुविधा आणि इतर भौतिक सुविधा असल्याची खात्री करावी.
05. परीक्षा केंद्रांवर विद्यार्थ्यांना प्रवेश देताना प्रतिबंधित साहित्य (मोबाईल, स्मार्ट वॉच, पुस्तके, इयर बड्स इ.)जवळ बाळगू नये अशा सूचना दिलेल्या आहेत, त्याची अंमलबजावणी होत आहे की नाही ते तपासावे.
06. विद्यार्थ्यांकडे केवळ कॉपींग मटेरीयल आहे किंवा कसे एवढ्याच तपासणी पुरते भरारीपथकाचे उद्दीष्ट नसावे. भरारीपथकाने केंद्रावरील उपलब्ध सुविधा/गैरसोयी, वरील मुद्दे क्र. 1 व 2 याबाबत प्रक्रिया व अन्य बाबींची माहितीही आपल्या अहवालात स्पष्टपणे नमूद करावी.
07. सर्व भरारी पथकांनी योग्य तपासणी, पडताळणी, निरीक्षण व खात्रीनंतरच कॉपी केसेस नोंदवावी. त्यासंबंधीचे पुरावे त्या उत्तरपुस्तिकेसोबत असणे अनिवार्य आहे. असे सर्व संबंधित भरारी पथकांना अवगत करावे.
08. भरारी पथकांनी परीक्षाकेंद्र भेट तपासणीचे सुस्पष्ट अहवाल परीक्षा संपल्यावर त्वरित विभागीय केंद्रावर जमा करावेत.

विद्यापीठाच्या परीक्षा कॉपीमुक्त वातावरणात पार पडण्यासाठी , गैरप्रकार झाल्यास त्याबाबत योग्य ते पुरावे उत्तरपस्तिकांसोबत लावून त्याबाबतची कार्यवाही सुरळीत पार पाडण्यासाठी उपरोक्त सूचनांचे पालन करताना कुठलाही नियमभंग होणार नाही याची दक्षता घ्यावी.

आपल्या सततच्या सहकार्याबद्दल आभारी आहोत.

कळावे.

य.च.म.मुक्त विद्यापीठ, नाशिक
ज्ञानगंगा घरोघरी
विभागीय केंद्र, कोल्हापूर

(प्रा.(डॉ.) आर.व्ही.कुलकर्णी)
वरिष्ठ शैक्षणिक सल्लागार
विभागीय केंद्र, कोल्हापूर